# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २८८-२२** **दिनांक २९/०९/२०२२**

## सोबत काम करणाऱ्या महिलेने विनापरवानगी बँक खात्यावरुन मोबाईलद्वारे काढलेले ९०,०००/- रुपये रक्कम परत मिळविण्यात सायबर गुन्हे कक्षास यश.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या नर्स महिला यांचे बँक खात्यामधून कोणतीही लिंक अथवा कोणताही ओटीपी शेअर न करता त्यांचे बँक खात्यामधून ९०,०००/- रुपये कोणीतरी अज्ञात इसमाने काढून घेतलेबाबतची तक्रार सायबर गुन्हे कक्ष येथे प्राप्त झालेली होती.

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांची बँक खात्याचे तपशीलाचे अवलोकन केले असता सदरची रक्कम पेटीएम बँकेचे खात्यावर गेल्याचे दिसून आले. तात्काळ पेटीएम कंपनीसोबत पत्रव्यवहार करुन माहिती घेतली असता सदरची रक्कम पुढे महाराष्ट्र बँकेचे खात्यावर वळती झाल्याबाबत माहिती प्राप्त झाली. याबाबत तक्रारदार यांचेकडे विचारपूस केली असता सदरचे बँक खाते हे त्यांचे हॉस्पीटल मध्ये काम करणाऱ्या मैत्रीणीचे आढळून आले. त्याबाबत संशयित बँक खातेधारक यांना तक्रारीबाबत अवगत केले असता त्यांनी फसवणूक रक्कम तक्रारदार यांचे बँक खात्यावर पुन्हा वर्ग केलेली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **आपली बँकेसंदर्भातील वैयक्तीक माहिती कोणासही देवू नये.**
- **आपला मोबाईल इतरांना हाताळण्याकरीता देण्याअगोदर योग्य ती खबरदारी घ्यावी.**
- **आपल्या ऑनलाईन व्यवहारासंदर्भातील पासवर्ड, पिन नंबर कोणासोबतही शेअर करु नये. तसेच ते ठराविक अंतराने बदलत रहावे.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, असा प्रकार आपल्यासोबत घडलेला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अति.कार्य. पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/१२००७ माधूरी धिंडे, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, मसुब आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.

**----0000----**